सोलापूर विद्यापीठाच्या नामांतरणासंदर्भात निर्णय घेण्याकरिता मंत्रिस्तरीय उपसमिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- नामांतर २०१८/प्र. क्र. ३२/विशि-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ०३ मार्च, २०१८.

प्रस्तावना :-

सोलापूर विद्यापीठाच्या नामांतरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या प्रकरण १ मधील अनुक्रमांक १० येथे सोलापूर विद्यापीठ ऐवजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अशी सुधारणा करण्याबाबत दि. २१/१२/२०१७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन, या विषयावर अधिक विचारविनियम करण्याकरिता मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिस्तरीय उपसमिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन मंत्रिस्तरीय उपसमिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सोलापूर विद्यापीठाच्या नामविस्ताराबाबत अधिक विचारविनिमय करुन निर्णय घेण्याकरिता खालीलप्रमाणे मंत्रिस्तरीय उपसमिती गठीत करण्यात येत आहे.

अ. क्र.	मा. मंत्री महोदयांचे नांव व खाते	पदनाम
१	श्री. विनोद तावडे, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण)	अध्यक्ष
२	श्री. गिरिश बापट, मा. मंत्री (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण)	सदस्य
३	प्रा. राम शिंदे, मा. मंत्री (जलसंधारण, राजशिष्टाचार)	सदस्य
४	श्री. महादेव जानकर, मा. मंत्री (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास)	सदस्य

२. समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

१) समिती अंतिम निर्णय घेण्यापूर्वी, सोलापूर विद्यापीठाचा नामविस्तार अथवा नामांतरणाच्या अनुषंगाने विविध संघटना, विद्यार्थी संघ, राजकीय पक्ष व सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून आतापर्यंत प्राप्त झालेली निवेदने व पत्रे याव्दारे सुचविलेली नांवे विचारात घेईल. त्याकरिता

आवश्यक असलेली माहिती कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर एकत्रित करुन समितीस सादर करतील.

२) समिती नामांतरण/नामविस्ताराच्या अनुषंगाने संबंधितांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य/योगदान इ. बाबी विचारात घेईल.

४. सदर समितीच्या बैठका अध्यक्ष, मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडतील. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर हे उक्त समितीच्या बैठकांना प्रत्यक्ष उपस्थित राहून आवश्यक ते सर्व सहकार्य करतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०३१७०८५३५९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2018.03.03 16:48:54 +05'30'

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) श्री. विनोद तावडे, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.
२) श्री. गिरिश बापट, मा. मंत्री (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण), मंत्रालय, मुंबई.
३) प्रा. राम शिंदे, मा. मंत्री (जलसंधारण, राजशिष्टाचार), मंत्रालय, मुंबई.
४) श्री. महादेव जानकर, मा. मंत्री (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास), मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
६) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) कुलगुरू, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
९) कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
१०) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर
१२) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
१३) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४) मा. अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१५) सह सचिव (विशि) यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई
१६) निवडनस्ती.